Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

VOL- VII ISSUE- VII JULY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# रचनावादी शिक्षण पद्धती मधील भावनिक बुद्धिमत्तेच्या विकसनाची गरज व विकसनसाठीची वर्गाध्यापनातील ध्येय धोरणे

**श्री. राहुल आनंदराव चित्रकार,**

कर्मवीर हिरे कला शास्त्र वाणिज्य व शिक्षण शास्त्र महाविद्यालय ,

गारगोटी

रचनावादी शिक्षण पद्धती ही सध्या प्रसिद्ध असणारे शिक्षण पद्धती आहे. भारतामध्ये हिचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. विद्यार्थ्यांची शिकण्याची प्रक्रिया ही त्यांना असलेले पूर्वज्ञान याबरोबरच नवा अनुभव नवी माहिती आणि शिकण्याची तयारी या तीन गोष्टींनी होते . रचनात्मक शिक्षणप्रक्रिया ही विद्यार्थ्याच्या पातळीवर साधारणपणे पुढील प्रमाणे होते विद्यार्थ्यांची जैविक विकास स्थिती ,त्याचे पूर्वीची मूल्यमापन ,त्याच्या मेंदूमध्ये निर्माण झालेली ज्ञानरचना ,हे सर्व पूर्वज्ञानात येते. याचबरोबर विद्यार्थ्याला नवी माहिती किंवा नवा अनुभव यामधील माहितीचे स्वरूप ,प्रमाण ,नाविन्य, भाषा यांच्यामध्ये क्रिया प्रतिक्रिया होतात. जर असलेला नवा अनुभव जुन्या अनुभवाशी जुळत असेल तर जिरवून घेणे (Assimilation ) व जर नवा अनुभव वेगळा असेल तर नवीन ज्ञानरचना तयार होऊन जुळवून घेणे Adaption ) होते या सर्वांवर प्रभाव पडणारी गोष्ट म्हणजे विद्यार्थ्यांची शिकण्याची तयारी होय. यामध्ये विद्यार्थ्यांची उत्सुकता, भावनिक अवस्था ,वयोमानानुसार योग्य उपक्रम ,अधिकाधिक संवेदनांचा वापर, नवनवीन आव्हाने व प्रसन्न असे भौतिक वातावरण या घटकांचा समावेश होतो.

रचनावादामध्ये मुख्यतः तीन प्रक्रियांचा समावेश होतो एक वर्गातील प्रक्रिया ज्यामध्ये त्याला विविध असे कृतिशील अनुभव मिळतात व त्याद्वारे तो अनुभव घेण्याची प्रक्रिया करतो. याबरोबरच दुसरा भाग म्हणजे मेंदूमधील प्रक्रिया, यामध्ये त्याला वर्गातील घडणारी गोष्ट समजणे,त्याचे अनुभवामध्ये रूपांतर होणे ,अनुभवाचे ज्ञानात रूपांतर होणे व ते ज्ञान दीर्घकालीन स्मृतीत जाणे. सर्वात महत्त्वाची म्हणजे विद्यार्थ्यावरील शिक्षण प्रक्रियेचा होणारा परिणाम घेतलेल्या अनुभवातून मिळालेले ज्ञान स्मृती मधून गरजेनुरूप कृतीत उतरणे, विचारात वर्तनात व कृतीत ज्ञानाचे रूपांतरण होणे ,म्हणजेच समज येणे किंवा शहाणपण येणे होय. याद्वारे विद्यार्थी आपले जीवन समृद्ध करू शकतो. रचनावादी वर्गामध्ये अनुभवांची समृद्धता, योग्य व वयोगटानूसार आव्हाने ,भावनिक सुरक्षितता आणि स्वतःहून अर्थ शोधन ही चार तत्वे वापरली जातात .

रचनावादी शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थीकेंद्री शिक्षण असते. शिक्षण हे सक्रिय पद्धतीने दिले जाते. सामाजिक संपर्कातून आंतरक्रियात्मक रित्या शिक्षण दिले जाते. अर्थ निर्मिती करण्यासाठी विद्यार्थी संघ भावनेतून ,सहयोगातून उपक्रम करतात. परस्परांशी उत्तम संवाद साधतात, यामुळे त्यांच्यामध्ये भावनिक बुद्धिमत्तेचे विकसन होणे गरजेचे ठरते.

भावनिक बुद्धिमत्तेचे विद्यार्थ्यांना होणारे उपयोग भावनिक बुद्धिमत्तेमुळे विद्यार्थ्यांचे एकमेकांशी म्हणजे समवयस्कांशी तसेच शिक्षकांची उत्तम प्रकारचे संबंध प्रस्थापित होतात. भावनिक बुद्धिमत्तेमुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणारे तणाव व चिंता कमी होतात. त्यांच्याशी जुळवून घेणे किंवा मात करणे विद्यार्थ्याला शक्य होते. याचबरोबर उत्तम प्रकारे अध्ययन करणे सहकार्य घेणे सहयोग देणे याला उत्तेजन मिळते.विद्यार्थ्याला निर्णय घेणे समस्या सोडविणे या प्रक्रियेमध्ये उत्तम अशा प्रकारच्या फायदा होतो. याबरोबर त्याच्यामध्ये आत्मविश्वास आत्मसन्मान वाढतो. विद्यार्थ्यांमधील उत्पादकता वाढते .अध्ययन-अनुभूती घेताना आनंदी, सहकार्यात्मक, विश्वासार्ह अशा वातावरणाची निर्मिती होते. त्याचे मानसिक आरोग्य वाढते. त्याच्यामधील नेतृत्व संघटन अशा क्षमतांचा विकास होतो.विद्यार्थ्याला वैयक्तिक व व्यावसायिक विकासासाठी मदत मिळते. जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी खूप उपयोग होतो, म्हणून भावनिक बुद्धिमत्ता विकसित करणे खूप

महत्त्वाचे आहे. यासाठी वर्गात अध्यापनामध्ये शिक्षक पुढील प्रमाणे ध्येयधोरणे ठरवू शकतात.

ही भावनिक बुद्धिमत्ता म्हणजे काय हे आपण थोडक्यात पाहू व तिच्या विकसनासाठी आवश्यक धोरणे यांची चर्चा प्रस्तुत शोध पत्रिकेत करण्यात आली आहे.

भावनिक बुद्धिमत्ता इमोशनल इंटेलिजन्स याचा अर्थ खालील प्रमाणे होतो

1. स्वतःमधील भावना ओळखणे आणि समजून घेणे (आत्मजागृती,)
2. इतरांमधील भावना ओळखणे आणि समजून घेणे (सहानुभूती)
3. स्वतःच्या भावनांचे नियमन आणि व्यवस्थापन(स्व-नियमन)
4. स्वतःला आणि इतरांना प्रेरित करणे (प्रेरणा )
5. प्रभावी संबंध विकसित करणे प्रभावीपणे संवाद साधणे (सामाजिक कौशल्य)

या सर्व गोष्टी भावनिक बुद्धिमत्तेत समाविष्ट होतात. भावनिक बुद्धिमत्ता ही व्यक्तिविकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असते भावनिक बुद्धिमत्ता सद्य-परिस्थितीच्या शिक्षणामध्ये विकसित होण्यासाठी पुढील प्रमाणे धोरणे वापरली जातात .

भाषा शिक्षणासाठी रचनावादी वर्गामध्ये भावनिक बुद्धिमतेचा विकास होण्यासाठी पुढील धोरणे वापरतात.

१. आत्मचिंतन होण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवले जातात .स्वमूल्यमापनासाठी रुब्रिक्स(रुब्रिक्स हे शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे, असाइनमेंट्स आणि प्रकल्पांचे मूल्यांकन आणि मूल्यांकन करण्यासाठी वापरले जाणारे साधन आहे. रुब्रिक हा निकष किंवा मार्गदर्शक तत्त्वांचा एक संच आहे ,जो विशिष्ट कार्य किंवा असाइनमेंटसाठी अपेक्षा आणि मानकांची रूपरेषा दर्शविते.) वापरतात. विद्यार्थ्यांमध्ये चिंतनशील अशा प्रकारच्या चर्चा घडवून आणल्या जातात. पाठ्यपुस्तक व संदर्भ पुस्तके यांचा आधार घेऊन योग्य त्या ठिकाणी या प्रकारची उपक्रम कृती राबवण्याचा प्रयत्न केला जातो.

२.भावनिक बुद्धिमत्तेतील महत्त्वाचा घटक म्हणजे समानुभूती निर्माण करणे होय. यासाठी वेगवेगळ्या प्रकारची भूमिका पालन दृष्टिकोन निर्मितीसाठीचे उपक्रम साहित्य मंडळे यांचा उपयोग केला जातो. याद्वारे विद्यार्थ्यांना भूमिका साकार करणे, दृष्टिकोन निर्मितीत करणे आणि साहित्यातून एखाद्या गोष्टीची सखोल जाणीव होते. त्यांच्यामध्ये पीडित शोषित किंवा दुर्बल व्यक्ती प्राणी निसर्ग या संदर्भात समान अनुभूती निर्माण होते.

३.भावनिक बुद्धिमत्तेच्या वाढीसाठी सहकार्यात्मक गटकार्य याबरोबरच सांघिकरित्या कार्य करण्यासाठी उत्तेजन देणे आणि निर्माण होणाऱ्या संघर्षाचे निराकरण करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. या धोरणांच्यामुळे सहकार्य निर्मिती होणे स्वतः व इतरांना प्रेरणा देणे, प्रभावी संबंध विकसित करणे ,याबरोबर संवाद साधणे वेळप्रसंगी भावनिक नियंत्रण करण्यासाठी मदत केली जाते .

४.भावनेसंबंधी शब्द संग्रह निर्मिती करणे ही भाषा टारगेट लँग्वेज म्हणजेच शिकण्याची भाषा असायला हवी. जेणेकरून विद्यार्थ्यांच्या मनामध्ये स्वतःच्या भावना व इतरांमधील भावना या संदर्भात उदबोधन होईल. याद्वारे विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा विकास घडण्यासाठी रचनावादी वर्ग उपयुक्त ठरतो.

५. रचनावादी वर्गामध्ये “माइंड फुलनेस” चा सराव घेतला जातो यामध्ये ध्यान-धारणा, प्राणायाम ,विपश्यना यासारखे माईंड फुलनेसचे सराव घेतले जातात. याद्वारे विद्यार्थी सतत जागरूक राहून द्वंदात्मक परिस्थितीत परिस्थितीत स्वतःच्या भावनांच्या नियंत्रण करू शकतो. आपल्या भावना ओळखून त्यांचे नियमन व व्यवस्थापन करणे, यामार्फत भावनिक बुद्धिमत्तेचा विकास करू शकतो

६. रचनावादी वर्गामध्ये अभिप्राय आणि स्वयं-मूल्यमापन या उपक्रमाद्वारे नियमित स्वरूपात प्रत्याभरण घेऊन विद्यार्थ्यांना स्वयं-मूल्यमापनाची संधी उपलब्ध करून दिली जाते .ज्यामुळे भावनिक बुद्धिमत्तेचा विकास होण्यास मदत होते.

७. वास्तविक जीवनातील परिस्थिती आणि केस स्टडीज( एखादी व्यक्ती, गट, परिस्थिती वगैरेंचा विशिष्ट

काळात केलेला तपशीलवार अभ्यास; व्यक्ति-अभ्यास.) म्हणजेच विशिष्ट अशा घडलेल्या घटनांचा अभ्यास करून विद्यार्थी स्वतःच्या भावना ओळखतो दृष्टिकोन निर्मिती करतो व भावनांचे नियमन करण्यासाठी तयार होतो.

८ . शिक्षक वर्गामध्ये काही वेळा सादरीकरण करतात .विद्यार्थ्यांना अभिप्राय विचारतात त्यावर चर्चा घडवून आणतात. अशा रचनात्मक अभिप्रायातून विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन तयार होतो .समानुभूतीचा अनुभव घेण्यास मदत होते.

९ . विद्यार्थ्यांच्या मध्ये स्वयंप्रेरणा वाढण्यासाठी त्यांना अध्ययनामध्ये वेगवेगळे विषय उपक्रम सादरीकरण याविषयी स्वायत्तता देण्याचा प्रयत्न केला जातो. त्याबरोबर त्यांना योग्य निवडीसाठी संधी दिली जाते.

१० . भाषा शिकवताना वेगवेगळ्या उपक्रमामध्ये किंवा अध्ययन अनुभूतीमध्ये विद्यार्थ्यांच्यासाठी भाषा विषयक उपक्रम ,उदाहरणार्थ भूमिका पालन , नाट्यीकरण ,सादरीकरण यामधून भावनिक विकासास वाव दिला जातो .अर्थातच भावनिक बुद्धिमत्तेच्या विकासास चालना दिली जाते.

११.रचनावादी वर्गातील वातावरण हे सुरक्षित ,आश्वासक तसेच सर्वसमावेशक अशा पद्धतीचे असते. वर्गातील अध्ययन अध्यापन संस्कृती ही विद्यार्थ्याला स्वतः निवड करून, स्वतःचे पूर्वज्ञान वापरून, आवश्यक बदल घडवून नवीन ज्ञान तयार करण्यासाठी मदत करणारी असते. ज्यामुळे विद्यार्थ्याला प्रेरणा मिळते व इतरांनाही प्रेरित करण्यासाठी मदत मिळते. या वर्गामध्ये विद्यार्थी प्रभावीपणे संवाद साधणे याद्वारे प्रभावी संबंध निर्माण करतो. \

१२.रचनावादी शिक्षणामध्ये पालक आणि समाजातील समुदायांचा सहभाग घेतला जातो .यामधून आंतरक्रियात्मक प्रक्रिया घडवून विद्यार्थ्यांचे दृष्टिकोन विकसित होतात. इतरांच्या भावभावना समजतात स्वतःच्या भावनांचे व्यवस्थापन करण्यासाठी मदत होते.

१३.ज्ञानरचनावादी वर्गामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे भावनिक बुद्धिमत्तेचे विकसन केले जाते यासाठी मूल्यांकन आणि मूल्यमापन केलेले दिसून येते.

१४. :भावनिक बुद्धिमत्तेच्या विकासासाठी शिक्षकांना प्रशिक्षण व संसाधने पुरवठा करणे या धोरणाचा उपयोग करणे गरजेचे आहे

१५. आज तंत्रज्ञानाचा प्रभाव सर्व शिक्षण पद्धतीवर दिसून येतो तंत्रज्ञानाची योग्य ती मदत घेऊन अशा प्रकारची साधने ॲप्लिकेशन्स हे भावनिक बुद्धिमत्तेच्या विकासासाठी उपयुक्त ठरू शकते.

रचनावादी वर्गामध्ये भावनिक बुद्धिमत्तेचा विकसनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मजागरूकता ,स्वतःच्या भावना ओळखणे ,स्वतःचे सामर्थ्य व कमकुवतपणा समजून येणे शक्य होते. विद्यार्थी स्वनियमन करू शकतो स्वतःमधील भावना प्रेरणा आणि शिकण्याच्या धोरणांचे व्यवस्थापन करणे सोपे जाते. विद्यार्थ्याला भावनिक बुद्धिमत्तेमुळे समवयस्कांचे दृष्टिकोन समजून घेणे, त्यांचे सहकार्य घेणे, त्यांना सहयोग करणे आणि सर्वसमावेशकता वाढवणे शक्य होते. विद्यार्थी सामाजिक कौशल्य शिकतो प्रभावीपणे संवाद साधू शकतो, संघर्षात्मक परिस्थितीत योग्य निर्णय घेऊ शकतो, बदलांशी जुळवून घेऊ शकतो आणि टिकून राहू शकतो. एकंदरीत भावनिक बुद्धिमत्तेमुळे विद्यार्थी स्वतःचे अध्ययन अनुभव समृद्ध करू शकतो. आपल्या बरोबरीच्या विद्यार्थ्यांशी सन्मित्र किंवा शिक्षकांची आपले संबंध दृढ करू शकतो. जीवनामध्ये आवश्यक असणारे कौशल्य प्राप्त करून घेऊ शकतो. आवश्यक असणाऱ्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करू शकतो. स्वतःमध्ये सकारात्मक आणि आश्वासक अध्ययन वातावरण निर्माण करू शकतो.

भावनिक बुद्धिमत्ता वाढीसाठी शिक्षक स्वतः विद्यार्थ्यांच्या समोर एक आदर्श भावनिक बुद्धिमत्ता असणारा किंवा असणारी मॉडेल(आदर्श नमूना ) बनू शकतो . भावनिक बुद्धिमत्तेसाठी आवश्यक असे उपक्रम चर्चा शिक्षक घेऊ शकतो. विद्यार्थ्यांना आत्मजागृतीसाठी प्रोत्साहित करू शकतो. विद्यार्थ्यांच्या सामाजिक कारणासाठी आणि सहकार्यासाठी विविध मार्गातून संधी उपलब्ध करून देऊ शकतो.विद्यार्थ्यांना योग्य त्या संधी देऊन त्यांचे सामाजिक करा आणि सांघिक सहकार्य वाढवू शकतो.

एकंदरीत शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील भावनिक बुद्धिमत्ता वाढवणे उपयुक्त ठरू शकते .यासाठी शिक्षक व विद्यार्थ्यांचे साठीची धोरणे योग्य पद्धतीने राबवली तर

भावनिक बुद्धिमत्तेचा विकास करणे शक्य होईल .शेवटी शिक्षण म्हणजे भविष्याची तयारीच होय आयुष्याला सामोरे जाताना विद्यार्थ्यांना योग्य अशा पद्धतीचे शिक्षण मिळेल व त्या आयुष्यातील सर्वच परिस्थितीमध्ये आनंदाने जीवन जगू शकतात असे म्हणता येईल .

**संदर्भ:**


1. शिक्षण परिवर्तनाची सामाजिक चळवळ :प्रा रमेश पानसे ,डायमंड पब्लिकेशन ,सदाशिव पेठ ,पुणे.
2. रचनावादी शिक्षण: रमेश पानसे, वितरक, ग्राम मंगल, पुणे कार्यालय ,कोथरूड .(२०१० )
3. मैत्री ज्ञान-संरचनावादशी: संपादक राजश्री बाम , सहसंपादक शीला कोलटकर ,निराली प्रकाशन (एप्रिल २०१३ )
4. इमोशनल इंटेलिजन्स :डॅनियल गोलमान (अनुवाद पुष्पा ठक्कर ), साकेत प्रकाशन, औरंगाबाद. (२०१५ )